# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 23.03.2026** **वार- सोमवार**

---

**जिजाऊबस**

एसटी महामंडळाच्या ताफ्यात 'राजमाता जिजाऊ' या नावानं तीन हजार अत्याधुनिक स्मार्ट बस दाखल होणार आहेत. या बससेवेचं लोकार्पण उद्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होईल. 56 प्रवाशांसाठी आसन व्यवस्था असलेल्या या बसमध्ये जीपीएस, सीसीटीव्ही कॅमेरे, पॅनिक बटन आणि इलेक्ट्रॉनिक मार्ग फलक यांसारख्या आधुनिक सुविधा उपलब्ध असतील. या बसेस प्रामुख्याने खूप गर्दीच्या मार्गांवर शटल सेवेसाठी चालवल्या जाणार आहेत.

**भारतटॅक्सी**

पुणेकरांसाठी येत्या मे महिन्यापासून भारत टॅक्सी सेवा उपलब्ध होईल, अशी माहिती पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयानं दिली आहे. यामुळे पुणेकरांना शहरांतर्गत प्रवासासाठी लवकरच एक स्वस्त पर्याय उपलब्ध होणार आहे.

**रिंगरोड**

पुणे रिंगरोड या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या कामाला वेग आला असून, सुमारे 25 टक्के काम पूर्ण झाल्याची माहिती, रस्ते विकास महामंडळाचे अधीक्षक अभियंता राहुल वसईकर यांनी दिली. राज्यातील पायाभूत सुविधांच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वाचा असून, या प्रकल्पामुळे भविष्यात पुण्याच्या वाहतूक व्यवस्थेला मोठा दिलासा मिळणार आहे.

**रामदास आठवले**

पुण्यात आयोजित दुसऱ्या पाली साहित्य संमेलनाचं उद्घाटन, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते काल झालं. पद्मपाणी फाउंडेशन आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पाली आणि बौद्ध अध्ययन विभागानं हे संमेलन आयोजित केलं होतं. पाली भाषा अतिशय समृद्ध आहे, असं आठवले यावेळी म्हणाले. विज्ञानवाद, समानता, मानवता, शांतता ही मूल्ये तसंच बौद्ध तत्त्वज्ञान पाली भाषेतूनच जगभरात पोहोचलं, पाली भाषेचा प्रचार आणि प्रसार मोठ्या प्रमाणावर व्हावा, यासाठी शासकीय पातळीवर सर्व प्रकारची मदत करू अशी ग्वाही आठवले यांनी दिली. बनारस हिंदू विश्वविद्यालयाच्या पाली विभागाचे प्रमुख, आणि संमेलनाध्यक्ष प्रा. डॉ. बिमलेंद्र कुमार, उपमहापौर परशुराम वाडेकर, यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**हुतात्मादिन**

देशासाठी आपल्या प्राणांची आहुती देणारे क्रांतिकारक भगत सिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना आज हुतात्मा दिनानिमित्त देशभरात सर्वत्र आदरांजली अर्पण करण्यात येत आहे. पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्येही विविध संस्था संघटनांच्या वतीनं या थोर देशभक्तांना आदरांजली अर्पण करण्यात आली. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने महापौर रवि लांडगे यांनी भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली अर्पण केली. पुणे जिल्ह्यातील राजगुरू नगर इथल्या राजगुरू यांच्या वाड्यामध्येही अनेक नागरिकांनी हुतात्म्यांना आदरांजली अर्पण केली.

**परिसंवाद**

पिंपरी चिंचवड मधील औद्योगिक विकास महामंडळ आणि कोरियाच्या सूक्ष्म आणि मध्यम उद्योग संघटनेनं काल एका परिसंवादाचं आयोजन केलं होतं. कोरियन उद्योग कंपन्यांना महाराष्ट्रात गुंतवणुकीच्या संधी या विषयावर या परिसंवादात विचार मंथन करण्यात आलं. महाराष्ट्र आणि कोरियाच्या उद्योगाला चालना देण्यासाठी कोरिया फॅसिलिटेशन सेंटरची स्थापनाही यावेळी करण्यात आली. कोरियन कंपन्या, एमआयडीसी आणि प्रशासनातील विविध शासकीय भागधारक कंपन्या यांना एकाच व्यासपीठावर आणण्यासाठी या सेंटरची स्थापना करण्यात आली आहे.

**पासपोर्ट कार्यालय**

मुंढवा इथं कार्यरत असलेलं पासपोर्ट सेवा केंद्र येत्या 30 मार्चपासून पाषाण इथं स्थलांतरित होणार आहे. ज्या अर्जदारांनी, मुंढवा पासपोर्ट सेवा केंद्रात 30 मार्च रोजी किंवा त्यानंतर पासपोर्टसाठी नोंदणी केली आहे; त्यांनी निर्धारित तारखेला पाषाण इथल्या पासपोर्ट सेवा केंद्राला भेट द्यावी, असं पासपोर्ट कार्यालयानं कळवलं आहे.

**Pcmc**

पिंपरी चिंचवड महापालिकेतर्फे राबवल्या जाणाऱ्या एचपीव्ही लसीकरण मोहिमेत आतापर्यंत 100 हून अधिक मुलींचं लसीकरण करण्यात आलं आहे. महानगरपालिकेच्या सर्व रुग्णालयांमध्ये सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत एचपीव्ही लस मोफत दिली जात आहे. नागरिकांनी आपल्या १४ वर्षे वयाच्या मुलींना नजिकच्या महानगरपालिका रुग्णालयात नेऊन मोफत लसीकरण करून घ्यावं, असं आवाहन महापालिकेच्या वैद्यकीय विभागानं केलं आहे.

**पीएमपी**

पुणे महानगर परिवहन महामंडळानं औंध ते डेक्कन जिमखाना या मार्गावर धावणारी १०५ क्रमांकाची बससेवा पुन्हा सुरू केली आहे. गेल्या काही महिन्यांपासून ही बससेवा बंद होती, मात्र औंध-बाणेर परिसरातील नागरिकांनी सातत्याने केलेल्या मागणीनंतर या मार्गावर आजपासून बससेवा पुन्हा सुरू झाली आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 35 तर किमान तापमान 17 पूर्णांक 7 दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्या तापमानात फारसा बदल होणार नाही; मात्र दुपारनंतर आकाश अंशतः ढगाळ राहील असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**